**प्रेसनोट** **दि.२३/०३/२०१९**

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेवुन वयोवृध्द महिलेस नातेवाईकांचे सुखरुप ताब्यात दिले

---

दि. १८/०३/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा. अभिरुची पोलीस चौकी येथे सहा. पोलीस फौजदार अशोक महाडीक हे दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना एक जेष्ठ महीला वय ७५ वर्षे, रा. वडगाव (पत्ता पुर्ण सांगता येत नाही.) या वृध्द महिलेने अभिरुची पोलीस चौकी येथे समक्ष येवुन तीला तीच्या घरी जाण्याचे काही समजत नसल्याबाबत सांगीतले. त्यावेळी सहा.पोलीस फौजदार अशोक महाडीक यांनी सदर महिलेस चहा नाष्टयाची सोय करुन तीच्याकडे अधिक चौकशी करता सदर महिलेच्या कापडी बटव्यामध्ये एक छोटी डायरी मिळुन आली. सदर डायरीमध्ये सदर महिलेचे मुळ गाव भोर या ठिकाणचा एक मोबाईल नंबर मिळुन आला. सदर मोबाईल नंबरवर सहा.पो.फ़ौज. अशोक महाडीक यांनी संपर्क केला असता त्यांना सदर वृध्द महिलेचा जावई नामे दिपक मरगळे यांचा मोबाईल नंबर प्राप्त झाला. सहा.पो.फ़ौज. अशोक महाडीक यांनी दिपक मरगळे यांना संपर्क केला असता ते कामानिमीत्त बाहेर असल्याचे समजले. परंतु त्यांनी त्यांची मुलगी नामे दिपाली दिपक मरगळे रा. नऱ्हे, पुणे. या ठिकाणी राहत असल्याचे सांगीतल्याने सहा.पो.फ़ौज. अशोक महाडीक यांनी सदर ठिकाणी अभिरुची मार्शल कर्तव्यावर असणारे पोलीस नाईक ६४९३ सागर वणवे व पोलीस शिपाई ८८१५ राजेंद्र मोरे यांना पाठवुन सदर वयोवृध्द महिलेची नातं नामे दिपाली मरगळे यांना अभिरुची पोलीस चौकीस बोलावुन घेवुन सदरची वयोवृध्द महिला ह्या त्यांच्या आजी असल्याची खात्री करुन घेवुन सदर वयोवृध्द महिलेस त्यांची नात नामे दिपाली मरगळे यांच्या ताब्यात सुखरुप दिल्याने पोलीसांनी तात्काळ केलेल्या सहकार्यामुळे सदर वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांनी पोलीसांचे मनपुर्वक आभार व्यक्त केले आहेत.

